# चैतन्य लहरी

सप्टेंबर / ऑक्टोबर २००६ अंक क्र. ९/१०



# गणेश पुजा २००६













## अनुक्रमणिका


- श्री गणेश गौरी पूजा, मुंबई : १८ सप्टेंबर ८८ ...... ३
- नवरात्री पूजा,लॉस एन्जिल्स, अमेरिका २७ ऑक्टोबर,२००२ ...... ७
- विश्वरूप दर्शन,देवी भागवत स्कंध सातवा ...... १२
- आदर्श सहजयोगी होण्यासाठी खालील गोष्टी अंगीकारणे आवश्यक आहे ...... १७


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट, सी.डी. पुस्तके, मासिके, श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी व युवाद्दष्टी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था ''निर्मल इंन्फोसिस्टीम ॲण्ड टेक्नॉलॉजि प्रा. लि पुणे'' या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की ,निर्मल इंन्फोसिस्टीमस ॲण्ड टेक्नॉलॉजिस प्रा. लि.या कंपनीच्या लेखी परवानगीशिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करू नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लीडरवर राहील.

तसेच चैतन्य लहरी मराठी मासिकाचे सन २००६ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT.LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यासाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल.कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL INFOSYSTEMS AND TECHNOLOGIES PVT. LTD.
BLDG. NO. 8, CHANDRAGUPT HSG. SOC. PAUD ROAD,
KOTHRUD,PUNE 411 O29. TEL. 020 25286537

शुभ दीपावली, २००६

# साक्षात आदिशक्तीच्या सान्निध्यात रक्षाबंधन!

रक्षाबंधनाच्या शुभदिनी म्हणजेच ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी Realize America Tour ची सांगता श्रीमाताजींच्या चरणी झाली. (Calabasas California येथील श्रीमाताजींच्या घरी) ही सहजयात्रा २२ जुलै रोजी चालू झाली होती. त्यामध्ये युवाशक्तीची ४० मुले सामील झाली होती. जवळजवळ ११५० मैलांचा प्रवास करून एक हजार पेक्षा जास्त लोकांनी जागृती देण्यात आली.

श्रीमाताजींनी खूप उत्साहाने, अतिशय प्रेमाने त्यांची चौकशी करून त्यातील प्रत्येकाला राखीचे प्रतीक म्हणून एक सुंदर घड्याळ भेट दिले. त्यावेळी, इतर लहान मुलांना शालेय वस्तू भेट देण्यात आल्या.

ब्राझीलच्या सहजयोग्यांनी श्रीमाताजींचे पणतू सुमंत व अनंत यांनाही राख्या बांधल्या. नंतर भजन ग्रुपला काही भजने म्हणण्यास सांगितले. त्यानंतर श्रीमाताजींच्या कृपेत सर्वांनी महाप्रसादाचा आनंद घेतला. ती सायंकाळ अविस्मरणीय ठरली. श्रीमाताजींची कृपादृष्टी प्रत्येकावर होती. एकीकडे सरोदवादन व बासरीवादन यांस त्या हळूवारपणे दाद देत होत्या. हा सर्व आनंदसोहळा चालू असतांना सर्व सहजयोगी चैतन्याने न्हाऊन निघाले होते.

# श्री गणेश चतुर्थी पूजा

दिनांक २७ ऑगस्ट २००६ रोजी श्रीमाताजींच्या Calabasas येथील घरी छोट्या प्रमाणात पूजा करण्यात आली.

पूजेच्या वेळी जवळजवळ १०० योगी केशरी-लालसर छटांचे कपडे घालून जमा झाले होते. सायंकाळी ७.३० च्या सुमारास श्रीमाताजी फिकट अबोली रंगाची साडी नेसून हॉलमध्ये आल्या. त्यांचे सर्व कुटुंबीय आणि सहजी मुले जमा झाली होती.

काही भजने झाली. लहान मुलांनी श्रीमाताजींच्या चरणांवर लाल फुले वाहिली. एकीकडे तुझ्या पूजनी हे भजन झाले. वातावरण पूर्णपणे चैतन्यमय झाले होते.

सर्व सहजयोग्यांना याचे स्मरण झाले की, श्रीमाताजींचे असे अमृतवचन आहे की, श्रीगणेशचतुर्थी म्हणजे- संपूर्ण मानवजातीत गणेशतत्त्व जागृत करण्याचे ते एक प्रतीक आहे.

● ● ●



# श्री गणेश गौरी पूजा

प.पू.श्रीमाताजी
निर्मलादेवींचे भाषण
मुंबई : १८ सप्टेंबर ८८

परमेश्वराने विश्वनिर्मितीची सुरूवात केली तेव्हा प्रथम ओम्कार नाद उमटला. त्यावेळीं परमात्म्यानें सृष्टीमध्ये सर्वप्रथम पवित्रतेचे संचरण घडवले. त्याच चैतन्याची जाणीव आज तुम्हाला होत आहे; त्याचा अनुभवही तुम्हाला मिळाला आहे. हा चैतन्यस्वरूप ओमकार आजही आपल्याला पवित्र करत आहे.

आज आपण श्रीगणेशांची पूजा करणार आहोत. साधारणपणे पूजा करताना बरेच लोक मनात काहीतरी कामना बाळगून पूजा करतात; नोकरी मिळावी, व्यवसाय वाढावा, मान-सन्मान केला जावा, घर व्हावे इ. अनेकानेक कामना माणूस बाळगत असतो. सिद्धिविनायकाची पूजा करतानाही लोक त्याच्याकडे अनेक मागण्या करतात. पण सिध्दिविनायक ही काही वस्तू प्रदान करणारी देवता नाही; त्यासाठी जगात सगळीकडे अनेक धंदे करणारी वा उपाय सांगणारी मंडळी आहेत.

आज जरी आपण श्रीगणेशांची साकार पूजा करणार असलो तरी तुम्ही आपल्या जीवनाचे अंतिम लक्ष्य काय आहे हे विसरता कामा नये. ते शिखर आपण गाठले आहे का याचा विचार तुम्ही जाणीवपूर्वक केला पाहिजे. अर्थात या पूजेपासून आपल्याला काय मिळवायचे आहे याचा नीट विचार केला पाहिजे. आज ज्या श्रीगणेशांची पूजा आपण करणार आहोत त्याचे निराकार स्वरूप आपल्याला ओळखायचे आहे व त्याची स्थापना आपल्यामध्ये करायची आहे. नुसते -जय जय- करून काहीच मिळणार नाही, ते तर इतर सारेच जण करतात श्री गणेशांची पूजा, श्री माताजींची पूजा, गौरीची पूजा सर्व सर्व झाले, पण त्यांची शक्ती आपल्यामध्ये संचारित झाली का त्या शक्तीचा प्रभाव आपल्या मन-बुद्धी-चित्त-वाणी इ.मध्ये झाला का,त्यांची शुद्धी झाली का हे नीट पाहिले पाहिजे. हेच तुम्ही दुसऱ्यांनाही देऊ शकता; त्यासाठींच तुम्हाला आत्मसाक्षात्कार दिला आहे.

श्रीगणेशांची पूजा करतांना तुम्हाला निराकारातून एकाकारिता मिळवली पाहिजे. आपण सारखे साकाराकडे जास्त लक्ष देतो. सहजयोग्यांनी निराकारामधूनच सर्व साधना व कार्य करायचे आहे. हेच निराकारामधून कार्य करण्याचे माध्यम आहे. एरवी ते होणार नाही. श्रीगणेशांना प्रसन्न करून घेण्यासाठी आधी आपण पूर्णपणे शुद्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी जीवनात ज्या मौलिक गोष्टी म्हणून समजल्या जातात त्यांच्याकडे लक्षपूर्वक ध्यान दिले पाहिजे. आजकालच्या सिनेमासारख्या वाईट गोष्टींमुळे आपली नजर खराब झाली आहे; आणि परिणाम म्हणून अबोधितता,

निर्व्याजिता, निश्चलता क्षीण होत आहेत या सर्वांचा एकच अर्थ निघतो की श्रीगणेशांचे मूळ (basic) गुणच आपण लक्षात घेतले नाहीत व आचरणात आणले नाहीत.

म्हणून सहजयोग्यांनी प्रामुख्याने लक्षात घेण्याची गोष्ट म्हणजे आपल्याला मिळालेली शक्ती विकसित होऊन जिवंत राहील याची काळजी घेतली पाहिजे. आपल्यामधील गौरी-स्थिती (कौमार्य पवित्रता) सांभाळली पाहिजे व तिचा गौरव राखला पाहिजे. हे जमले नाहीं तर सर्व फुकट जाईल. आजकाल बहुसंख्य लोक वाट्टेल त्या स्त्रीच्या मागें, जिच्यामध्ये पवित्रतेचा अंशदेखील नाही अशा स्त्रियांच्या मागे लागतात. ही सर्व नरकांत जाणाऱ्या लोकांची लक्षणे आहेत. मला तर हे स्पष्ट दिसत आहे. पण तुम्ही लोक अल्पसंख्य असलात तरी तुम्ही त्यांच्या नादी लागू नका, ते तुम्हाला शोभणार नाही. म्हणून कमीत कमी आपली नैतिकता आपणच सांभाळली पाहिजे.

काही लोकांवर विशेषत: परदेशातून आलेल्या लोकांवर भौतिक जीवनाचा पगडा असतो; नीतिमत्तेला ते फारसे मानत नाहीत. प्रत्येक दुकानाबद्दल, जाहिरातीबद्दल त्यांना आकर्षण वाटते. म्हणून निराकार समजण्याची शक्ती तुम्ही मिळवली पाहिजे. नाहीतर तुम्हाला सहजयोगी कसे म्हणायचे? आता तुम्ही जे कोणी झाले आहात त्याची शान राखलीच पाहिजे; राजा जनकही बाहेरून राजासारखेच व्यवहार करायचे. जोपर्यंत भौतिकतेचा पगडा व आकर्षण असेल तोपर्यंत हे जमणार नाही. मी तुम्हाला सर्व काही पुरवते कारण माझे तुमच्यावर प्रेम आहे; पण माझ्या दृष्टीने ती काही विशेष गोष्ट नाही. हे सर्व शब्दांत सांगणे अवघड आहे; माझा कटाक्षही तुमच्या लक्षात येणे अवघड आहे. मी करते म्हणून तुम्ही लोक तेच मागत रहा. असा याचा अर्थ नाही. त्यांतूनही मी दिलेल्या गोष्टीऐवजी काही मागणारे पण आहेत. शबरीची उष्टी बोरंही रामाने आनंदाने खाल्ली पण तुमचे असे वागणें पाहून मलाच आश्चर्य वाटते.

श्रीगणेशांचे आशीर्वाद मिळण्यासाठी सर्वप्रथम तुम्ही तुमचे चित्त शुद्ध केले पाहिजे. स्वच्छ केले पाहिजे; परमात्म्याकडे न लागता ते इकडे तिकडे धावत असेल तर त्याचा काहीं फायदा नाही. जोपर्यंत तुमचे चित्त स्वच्छ, शुद्ध होणार नाही तोपर्यंत ज्ञान मिळवू शकणार नाही. हे चैतन्य चित्तामधून वहात असते; चित्तामधूनच तुम्हाला ज्ञान मिळणार आहे. चित्त शुद्ध असते तेव्हां विचार-माध्यमातून कार्य होत असते. चित्तामधूनच, ध्यान, दिल्यावरच कार्य होऊ शकते. कधी कधी तर त्याचीही गरज पडत नाही. जे तुमचे ध्येय आहे त्याला लागणारी शक्ती या चित्तामधूनच परमचैतन्याकडून मिळणार आहे. त्यातून खूप कार्य तुम्ही करू शकता. ही मुख्य गोष्ट सोडली तर सहजयोगात येण्याचा काय फायदा? सहजयोग मिळाल्यावरही त्यांतून आर्थिक फायदा कसा होईल इकडे चित्त जात असेल तर सर्व खटपट व्यर्थ आहे. काही असेही आहेत की पूजेच्या कार्यक्रमाला फक्त पूजेसाठी लांब-लांबच्या गावाहून लोक येतात; आणि वर म्हणतात-श्रीमाताजींच्या दर्शनासाठी फक्त आलो-आणि वर फालतू गप्पा करत रहातात. खऱ्या सहजयोग्याला श्री माताजींचे दर्शन स्वत:च्या हृदयांतच झाले पाहिजे. ती शक्ती मी तुम्हाला दिली आहे. मी खरं म्हणजे शक्तीच आहे म्हणून मला निराकारांत तुम्ही प्राप्त करून घ्या; तुम्ही स्वत: शक्तीस्वरूप होऊन त्या शक्तीमध्ये रममाण झाले पाहिजे. पण हा विचार सहसा माणसाच्या मनात येत नाही, - मी..मी..माझे..माझे यांतच ते अडकून राहतात. उलट तुम्ही स्वत:ला -मा के बेटा-बेटी-आहोत असे का नाही समजत? सहजयोगात आल्यावर तुमचा धर्म-जात, गोत्र... सर्व काही बदलले आहे आणि नवीन जन्म झाला आहे हे नीट लक्षांत घ्या. श्रीगणेशांकडे पहा; ते मातेला पूर्णपणे शरणागत व श्रद्धाशील आहेत, ते तुमच्या हृदयात उतरण्यासाठी चित्त शुद्ध असणे फार आवश्यक आहे. शुद्ध चित्तामधूनच तुम्ही मला पाहू शकाल. चित्त अशुद्ध असेल तर तुम्हाला त्रासच होणार.

चित्त शुद्ध होते तेव्हा तुम्हालाच आश्चर्य वाटेल असे सुगंधी फुलासारखे तुम्ही बनाल आणि मी पण माझा सुंदर बेटा पाहून प्रसन्न होईन. तुम्ही भारी कपडे व पेहराव करून माझ्यासमोर आलात तरी मी इतकी प्रसन्न होणार नाही. असे व्यक्तिमत्त्व प्राप्त करण्यासाठी श्रीगणेशांची आराधना करा; श्रीगणेशांची संस्कृती म्हणजेच सौंदर्य. लोकमान्य टिळकांनी सामाजिक स्तरावर गणेशोत्सव का सुरू केला याचा विचार करा. श्रीगणेशांचे सौंदर्य म्हणजे बालकासारखा त्यांचा स्वभाव. अबोधितता आणि निरागसता यांचा परिपूर्ण आविष्कार. या स्वभावातच सर्व सौंदर्य आणि मोहकता भरलेली आहे; एरवी आपली चलाखी, नटणे-मुरडणे, स्मार्टनेस हे सर्व क्षणभंगुर आहे; तोंडावर त्याची स्तुति होईल पण पाठीमागे निंदाच होणार. श्रीगणेशांची अबोधितता साऱ्या विश्वातील सौंदर्य व्यापून आह. श्रीकृष्ण, श्रीराम, ईसामसी या सर्वांमध्ये अशा लहानपणची लीला दिसून येते. तुम्हाला खरा आनंद अनुभवायचा असेल तर सर्वप्रथम श्रीगणेशांसारखे बनले पाहिजे. आजच्या पूजेनंतर याचाच विचार करा. श्रीगौरीचे संचारण आपल्यामध्ये मिळवले तर श्रीगणेश समजणे सोपे आहे. म्हणून आधी श्रीगौरीची पूजा.

पूजेमधून हे सर्व मिळवायचे आहे म्हणून मी वर चित्तशुद्धीबद्दल बोलले. चित्तामधून विचार करून हे सर्व तुम्ही मिळवले पाहिजे. त्यासाठी चित्तामध्ये काय विचार चालले आहेत इकडे सावधपणे लक्ष द्या.पतंग उडवणाऱ्या मुलाचे बरोबरच्या मित्रांबरोबर गप्पा-विनोद करतानाही पतंगाच्या हालचालीकडे लक्ष असते. तसे हे हवे. सिंहासनावर बसलेल्या राजासारखे रहायला शिका. श्रीगणेशांची शक्ती मिळवायची असेल तर तुमचे सर्व लक्ष निराकारावर, आपल्यामधील प्रवाहित चैतन्यावर असले पाहिजे. ज्याचे चित्त-चैतन्यशुद्ध नाही तो भूक लागली असे म्हणतो. तुम्हाला मी माझ्यामध्ये धारण केले आहे, मग असे कसे होईल? मी तुमच्या स्वच्छतेकडे लक्ष देते पण तुम्ही स्वत: स्वत:ला स्वच्छ कधी करणार? कुणी म्हणतो-माझी आज्ञा पकडली आहे, माझा अहंकार वाढला आहे- हे कां होते? करणारा जर परमात्मा आहे तर हे कसे शक्य आहे? याला कारण म्हणजे आपण दुसऱ्याचे दोष पहातो व काढतो पण स्वत:च्या कमतरतेकडे लक्ष देत नाही. त्याचप्रमाणे आपली वाणी पण शुद्ध असली पाहिजे. सहजयोगातही शिव्या देणारे, आरडाओरड करणारे, बोलण्यामधे माधुर्य नसलेले असे लोकही आहेत; वाणी शुद्ध नाहींच आणि वर आणखी दांभिकता; वरवरचे रूप वेगळे पण आतून हृदय स्वच्छ नाही. जोपर्यंत आपले हित कशात आहे हे लक्षात घेतले जात नाही, फालतू गोष्टीमधे आपण अडकून राहतो. जोपर्यंत स्वत:संपूर्ण होण्याकडे दृष्टी ठेवत नाही तोपर्यंत चित्त शुद्ध होणार नाही. एक-दोन लोक असे शुद्ध(आलोकित)होऊन चालणार नाही तर सामूहिक स्तरावर हे कार्य झाले पाहिजे; त्याची आज फार जरूर आहे. नाही तर समस्त समाज कसा सुधारेल? प्रत्येकाने आपली या महान कार्यासाठी निवड झाली आहे हे भान सतत राखले पाहिजे;त्यासाठीच तुमचे शारीरिक, मानसिक, आर्थिक, प्रापंचिक असे सर्व प्रश्न सोडवले जात आहेत.पण पुढे काय? मला प्रत्येक अडचणीसाठीं साकडे घालण्याची जरुरी नाही. सहजयोगातून तुम्ही तुमचे प्रश्न सोडवले पाहिजेत. तुम्हाला तुमच्यामध्येच असलेल्या शक्तीला प्रकट करायचे आहे तुम्हीच तुमच्या प्रश्नांची व अडचणींची उत्तरे दिली पाहिजेत, माझ्यापर्यंत सर्व प्रश्न आणण्याची जरूर नाही. म्हणून या शक्तीचे संचारण झाले पाहिजे; तुमच्या मनामध्ये बुद्धीमध्ये हे संचारण व्हायला हवे म्हणजे सर्व प्रश्न सुटतील. शंकराचार्य, ज्ञानेश्वर, तुकाराम यांना काय मी सांगितले? त्यांनीच या शक्तीच्या संचारणामधून कार्य

केले. साकारामध्येच जर तुम्ही तृप्त राहिलात तर पुढें प्रगती होणार नाहीं. निराकाराला आपल्यामध्ये ओळखा व प्राप्त करून घ्या आणि खऱ्या अर्थाने स्वत:चे गुरू बना. जन्मभर शाळेतच शिकत राहिलात तर पुढें नोकरी कशी मिळणार? परमात्म्याच्या कार्याचे तुम्हाला माध्यम बनायचे असेल तर तुमच्यामधील सर्व दोष दूर झाले पाहिजेत. सहजयोगाची, सर्व चक्रांची, सर्व व्यवस्थेची माहिती तुम्हाला मिळाली आहे; नुसते ते वाचून वा मंत्र जपून हे होणार नाही. उदा. ज्याला आपला राग आवरता आला नाही तो सहजयोग काय करणार?

त्यासाठी आपल्यामधील श्रीगणेशांची शक्ती जागृत करून तुम्हाला पवित्र व्हायचे आहे.त्याच्या आड काही येत असेल तर तुमचेच भूत! चिडायचं, रागवायचं, दुसऱ्याला मारायचं हे गणेशशक्तीचे काम नाही. अशा व्यक्तीने सहजयोग सोडून पागलखान्यात जावे. सहजयोगात जे लोक स्वत:ला मोठे समजतात आणि असे वागतात त्यांची तोंडावर स्तुती केली जात असली तर पाठीमागे निंदाच होते. असे लोक सहजयोगातून बाहेर फेकले जातात. तुमची वाणीही अत्यंत स्वच्छ, सुंदर आणि मधुर असली पाहिजे; त्याच्या मागे काही कपट नको. सर्व काही शुद्ध हृदयापासून झाले पाहिजे. हृदयस्पर्श असला की सर्व काही हृदयापर्यंत पोचते. ही गाठ पक्की बांधून घ्या; श्रीगणेश मूलाधारात असले तरी हृदयात आल्यावर आत्मस्वरूप होऊन चैतन्यमय होतात. श्रीगणेश आत्माच आहेत व त्यांचा प्रकाश जेव्हा हृदयात उतरतो तेव्हाच चैतन्याचा निरानंद मिळतो. तुम्ही प्रत्येकजण ही शक्ती मिळवू शकता; हृदयात ज्याने श्रीगणेशांना स्थापित केले आहे त्याला काही सांगण्याची जरूर नाही; असा माणूस सदासर्वकाळ निरानंदामध्ये रममाण असतो. म्हणून तुम्ही आपली दृष्टी उन्नत अशा ध्येयाकडे ठेवा. हे असे कार्य आजपर्यंत कधी झाले नाही; तुम्हाला ती सिद्धी मिळूनही तुम्ही ते प्राप्त करून घेतले नाही तर त्यात माझा काही दोष नाही. तुम्ही जर ते मिळवू शकला तर एक सुंदर, गंभीर, तेजस्वी स्वरूप मिळून आत्म्याला पुलकित करू शकाल हाच निश्चय करून आजची पूजा करा; त्यातही गौरीपूजा महत्त्वाची कारण गौरी हीच शक्तिचालना देणारी कुण्डलिनी आहे; तीच तुम्हाला साकारामधून निराकारापर्यंत पोचवणार आहे. आपण सर्व या शक्तीचे पुजारी आहोत. जो नि:शक्त (शक्तीशाली नसलेला) आहे तो ही पूजा करू शकत नाही. या शक्तीला जागृत न करणारा व त्याचा प्रकाश प्राप्त करून न घेणारा स्वत:ला सहजयोगी म्हणवून घेऊ शकत नाही. -सहजयोगी- असे लेबल लावून घेण्याची ही गोष्ट नाही, हृदयाची(अंदर की) गोष्ट आहे, ती हृदयापासून प्राप्त होणारी आहे, हे राजकारण करण्यासारखे नाही; हा सहजयोग आहे, त्यात व्यक्तित्त्व आहे (व्यक्तिमत्त्व नव्हे). सहजयोग्याची ही एक पर्सनॅलिटी आहे. जोपर्यंत हिम्मत बाळगून आपण पुढें जाणार नाही तोपर्यंत सहजयोग बळकट होणार नाही.

मी माझ्याकडून खूप मेहनत घेतली आहे, खूप कष्ट केले आहेत. आता तुम्ही ते समाधान (Solid)मिळवले पाहिजे. आशा आहे की तुम्ही सर्वस्व अर्पून ध्यान-धारणा कराल; तरच कार्य होईल. या स्थितीला तुम्ही आलात की तुम्हीच म्हणाल -आम्ही पहाडापेक्षाही मोठे झालो-जसे तुकाराम म्हणाले होते- तुका झाला आकाशाएवढा- सहजयोगांत येऊन हेच मिळवायचे आहे.

माझे सांगणे ध्यानपूर्वक समजून घ्या, चित्तांत साठवून घ्या आणि याचसाठीं आजची पूजा व निराकर बनवण्यासाठीं गौरीमातेला प्रार्थना करा. सहजयोगांत आपण किती परिपक्व झालो (Excellence) हे स्वत:च पहा व जाणून घ्या; हीच शुद्ध इच्छा बाळगा.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

● ● ●



## नवरात्री पूजा

प.पू. श्रीमाताजी
निर्मलादेवींचे भाषण (सारांश)
लॉस एन्जिल्स, अमेरिका
२७ ऑक्टोबर, २००२

आज आपण देवीची पूजा करणार आहोत. आपण प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की देवीने डावी बाजू प्रथम शुद्ध केली आणि नंतर सहस्रारात आदिशक्ती स्वरूपात ती स्थापित झाली. डाव्या बाजूने देवीने केलेले सर्व कार्य देवीमाहात्म्या-सारख्या ग्रंथात लिहिले गेले आहे. देवीने आपल्याला स्मृती आणि सुबुद्धी दिली. त्याचबरोबर ती गणांकडून आपले संपूर्ण संरक्षण करते.

सर्व गण आपल्याला सुधारण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतात आणि देवीच्या आज्ञेनुसार ते कार्य करीत राहतात, त्यांना देवीकडूनच त्यासाठी शक्ती पुरविली जाते. डावी बाजू पूर्णपणे सांभाळण्याचे कार्य गणांकडून केले जाते. तुम्हाला माहीतच आहे की, डावी बाजू बिघडली तर कॅन्सर सारखे दुर्धर आजार होऊ शकतात. असे आजार गणांकडूनच बरे होऊ शकतात. कारण गणांवर देवीचे पूर्ण नियंत्रण असते. आपल्या सहजयोगामध्येही कॅन्सर बरा झालेले व डाव्या बाजूचे त्रास सुधारलेले लोक आहेत. सर्व गण श्रीगणेशांच्या आधिपत्याखाली असतात. म्हणून तुमच्यामधील गणेशतत्त्व जागृत असेल तर तुम्हाला काहीही त्रास होत नाहीत. पण गणेशशक्ती क्षीण झाली की अनेक प्रकारचे त्रास होऊ शकतात.म्हणून गणेशतत्त्व सक्षम करण्यासाठी आपण फार काळजी घेतली पाहिजे. नुकतेच मला डाव्या बाजूचे अनेक त्रास असलेल्या लोकांचे पत्र आले. अशा लोकांनी श्रीगणेश तत्त्व सुधारण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे ध्यान करणे.

ध्यानासाठी सर्वप्रथम कुण्डलिनी जागृत झाली पाहिजे. त्यानंतरच सर्वप्रकारच्या सुधारणा घडू शकतात. त्यानंतरच तुम्ही गणांबरोबर संवाद राखू शकता. एरवी माणूस कसल्या ना कसल्यातरी भ्रमामधे अडकतो आणि गणेश तत्त्वाकडेत्त दुर्लक्ष करतो. म्हणून देवीची पूजा करताना तुम्ही आपोआपच श्रीगणेशांचीही पूजा करता,कारण श्रीगणेशांच्या मागे देवीची शक्ती आहे. देवीची सर्वात महत्त्वाची आणि मोठी शक्ती म्हणजे ती तुमचे संपूर्ण रक्षण आणि संरक्षण करते. डाव्या बाजूलाही देवीचे पूर्ण संरक्षण मिळते. या संरक्षण कार्यामध्ये देवीच तुम्हाला सर्व मदत करते, मार्गदर्शन करते आणि आधार देते. हे सर्व कार्य देवी गणांकडून करून घेते. माणूस जेव्हा उजव्या बाजूला झुकतो तेव्हा देवीच त्याला मदत करून ठीक करते. तुमच्यामध्ये नम्रता निर्माण करते आणि तुम्ही तिची लेकरे आहात हा

समजूतदारपणा तुम्हाला देते. हे प्रत्येकाने लक्षात ठेवणे जरुरीचे आहे. माणूस जेव्हा कुठल्या एका प्रकारच्या टोकाला जातो तेव्हाच त्याला उजव्या वा डाव्या बाजूचे त्रास होऊ लागतात.

आजकालच्या जीवनामध्ये उजव्या बाजूचे प्रश्न अधिक अधिक गंभीर होत चालले आहेत आणि त्यातूनच 'अल्जायमर' सारखे रोग होत आहेत. या सर्वांचे मूळ कारण म्हणजे लिव्हर खराब होणे. लिव्हरमुळेच अनेक प्रकारचे रोग पैदा होतात. अतिविचार करणारे लोक, भविष्याबद्दलचा अतिशय त्रास करून घेणारे, आक्रमक व अहंकारी स्वभाव ही सर्व लिव्हर खराब झाल्याची लक्षणे असतात. लिव्हरची शक्ती संपुष्टात आली की मग तुमचे त्रास, आजार बरे करणे अशक्य होऊन जाते. अर्थात सहजयोगातून लिव्हर ठीक झाल्याची अनेक उदाहरणे आपल्याकडे आहेत. म्हणून नम्रपणा बाळगून सर्वांनी लिव्हरची काळजी घेतली पाहिजे. ह्या सर्व त्रासांपासून डाव्याबाजूसाठी गणांकडून संरक्षण मिळते आणि उजव्या बाजूच्या प्रतिक्रियांपासून तुम्हाला संरक्षण मिळते. या सर्वांमध्येच देवीचे माहात्म्य आहे. अर्थात देवीच आपले संरक्षण करेल, मार्गदर्शन करेल, काळजी घेईल हे गृहीत धरून राहू नये.

म्हणूनच नियमित ध्यान करणे फार फार महत्त्वाचे आहे. ध्यानाशिवाय तुम्ही काहीही मिळवू शकत नाही. ध्यानाला कसलाही पर्याय नाही. ध्यानामधूनच तुम्ही देवीच्या चैतन्य शक्तीच्या संपर्कात येता. सर्वसाधारण पशु-पक्षीसूद्धा सहजपणे देवीच्या कृपेत असतात. पण माणसाला बुद्धी आणि बौध्दिक स्वातंत्र्य असल्यामुळे ते कुठे ना कुठे तरी भरकटतात आणि अडचणीत सापडतात.विशेषत: अमेरिकन लोकांनी या बद्दल काळजी घेणे आवश्यक आहे आणि त्यासाठी त्यांच्यामध्ये भक्ती आणि समर्पण वाढले पाहिजे. भारतीय संस्कृतीमध्ये भक्ती सर्व साधारणपणे असतेच, म्हणून ते अहंकारासारख्या दोषांकडे फार वळत नाहीत. भक्ती कशी हृदयात निर्माण करावयाची हे सांगणे कठीण आहे. पण भारतामध्ये केवळ अनन्य भक्तीमधून खूप उन्नत झालेले अनेक महान साधू-संत होऊन गेले आहेत. म्हणून भारतीय लोकांमध्ये भक्तीभावना मुळातच असते. इथल्या लोकांसारखा विचित्र पंथ पाळण्याचे प्रकार तिकडे दिसत नाहीत. भक्ती आणि श्रद्धा बळकट झाल्याशिवाय उन्नती साधणे शक्य नाही आणि तुमचे अहंकारासारखे विचित्र दोष दूर होणे शक्य नाही.भक्तीची कुणावर सक्ती करता येत नाही कारण ती हृदयातच निर्माण होत असते. त्यासाठीच तुमच्यामधील सर्व सद्:गुण, तुमच्या बुध्दीमधील शुद्धता व्यवस्थित राहिली पाहिजे. त्यातूनच भक्तीचा खरा अनुभव आपल्याला अनुभवायला येतो. अशी भक्ती जेव्हा प्रकट होऊ लागते तेव्हा देवी तुमच्या बुध्दीमधून कार्य करु लागते.असे उन्नत झालेले अनेक संत भारतात होऊन गेले, त्यांची चरित्रे जरी तुम्ही वाचली तरी तुम्ही आश्चर्यचकित व्हाल. भक्ती म्हणजे ग्रंथ पारायण किंवा कोरडा जप - जाप आणि मंत्र पठण नव्हे. पण ती हृदयात अगदी खोलवर रुजली पाहिजे. आत्मा जेव्हा प्रकाशित होतो तेव्हा अशी भक्ती निर्माण होते आणि तुमच्यामधील सर्व दुर्गुण, चुकीच्या धारणा,वेडगळ समजूती गळून जातात.या सर्व दैवी गुणांचे वर्णन देवीच्या पवित्र ग्रंथात केलेले आहे. अशा भक्तीमधून तुमच्यामध्ये आपोआपच शुद्धबुद्धी(Wisdom) निर्माण होते आणि तुम्ही एक शुद्ध व्यक्तिमत्त्व बनता. हे दैवी शहाणपण हा देवीचा फार मोठा आशीर्वाद असतो. भक्तीमधून हेच मिळवायचे असते. सहजयोगामधून भक्तीचे खरे स्वरूप कळते आणि तुम्ही खऱ्या अर्थाने भक्ती जाणता आणि करता.याच्यामध्ये

कसल्याही प्रकारची अंधश्रद्धा नसते. अंधश्रद्धा असेल तर तुम्ही कसल्यातरी वेडगळ प्रकारच्या मार्गाकडे जाता.

कुण्डलिनी जागृतीमधूनच आपल्याला भक्तीचा खरा अर्थ समजतो आणि आपण खऱ्या अर्थाने भक्ती करतो. अशा भक्तीमधूनच सर्व प्रकारचे संरक्षण करण्याची शक्ती माणसाला मिळते. तुम्ही स्वत:ला आणि आजूबाजूच्या परिस्थितीला नीट समजू शकता.भारतामध्ये अनेक थोर भक्तांनी असे कार्य खूप केले आहे आणि त्यामुळे माझ्या कार्याला मदतच झाली आहे. आजकाल भारतामध्येही काही मूर्खपणाचे व खुळचटपणाचे प्रकार घुसले आहेत. त्याचे कारण शहाणपणाचा संपूर्ण अभाव.

म्हणून भक्तीमधूनच मिळविण्याची मुख्य गोष्ट म्हणजे तुमच्यामध्ये सुज्ञता, समजूतदारपणा व शहाणपणाच रुजला पाहिजे. त्यातूनच तुमची आकलन शक्ती प्रभावी होईल. आपण जे काय करतो ते शहाणपणाचे द्योतक आहे का, हे सतत तपासत राहिले पाहिजे. तसे नसल्यामुळे सहजयोगातही काही चमत्कारिक लोक आढळतात. पाश्चिमात्य संस्कृतीमध्ये भक्ती आणि श्रद्धा खूप मोठ्या प्रमाणावर अजून रुजली पाहिजे.भक्ती आणि श्रद्धा आपल्यामध्ये देवीच निर्माण करीत असते आणि ते आपण ध्यानामधूनच प्राप्त करुन घेऊ शकतो. त्याबाबतीत अनेक चमत्कार घडत असल्याचे तुम्ही अनुभवले आहे. त्याचबरोबर देवी तुम्हाला सर्वबाबतीत मार्गदर्शन करीत असते आणि तुम्हाला चुकीच्या मार्गावरून परावर्तित करीत राहते. डाव्या - उजव्या बाजूकडे न झुकता तुम्हाला मध्य मार्गावर ठेवण्यासाठी तीच कार्य करीत असते. तुम्ही जेव्हा स्वत:बद्दल चुकीची समजूत करून घेता किंवा निव्वळ बुध्दीमधून विचार करता तेव्हा ते चुकीचे असल्याचे तुमच्या लक्षात येते. म्हणून समर्पणाला सर्वात जास्त महत्त्व आहे. ''इस्लाम'' चा अर्थ ही समर्पण हाच आहे, पण ते सांगतानाही मोहंम्मद साहेबांनी आधी आत्मसाक्षात्कार झाला पाहिजे हे सांगितले आहे.

कुण्डलिनी जागृत झाल्यावरही आत्मसाक्षात्कारामध्ये प्रस्थापित होण्यास कधी कधी वेळ लागतो. पण एकदा का तुम्ही आत्मसाक्षात्कारामध्ये योग्य प्रकारे प्रस्थापित झालात की तुम्हाला देवीचे कार्य कसे चालते ते बरोबर समजते. काही लोक सहजयोगात येतात, माझा आदर करतात, पण मला नीट न समजून घेतल्यामुळे त्यांनाही त्रास होतात. त्याचे कारण देवी शक्तीबरोबर पूर्णपणे जोडले गेले नसतात. देवी शक्ती बरोबर जेव्हा तुम्ही संपूर्णपणे जोडले जाता तेव्हा तुमच्यामधून केवळ प्रेम आणि करुणा वाहू लागते आणि सर्व काही योग्यवेळी सुरळीतपणे घडून येते.म्हणून तुम्ही सदैव देवीकडे संरक्षणासाठी प्रार्थना करीत राहिले पाहिजे आणि त्यातूनच तुम्हाला शारीरिक, मानसिक, आध्यात्मिक अशा सर्व तऱ्हेचे संरक्षण मिळते. सहजयोग्यांना ही स्थिती मिळविणे सहज शक्य आहे या सर्वांच्या मुळाशी तुमच्यामध्ये जागृत झालेली सुबुद्धी असते. सुबुद्धी नसल्यामुळे मानवासमोर अनेक समस्या उभ्या रहातात. कोणी पैशाच्या मागे लागतो, कोणी अधिकार व सत्ता मिळविण्याच्या मागे लागतो, तर कोणी धर्माच्या आणि देवाच्या नावावर चुकीच्या गोष्टी करतो. सर्व धर्माचे मूळ सूत्र मानवाच्या हिताचे असले तरी त्याच्या आचरणामध्ये सुबुद्धीचा अभाव असला की धर्माच्या आणि देवाच्या नावावर लोक कलह तंटे वगैरे विध्वंस याच्या मागे लागतात आणि सर्व मानवसमाजाला हानी पोहचवतात.

सुबुद्धी माणसाला योग्य तेच मार्गदर्शन करते. चुकीचे काय आणि बरोबर काय हे त्याला आपोआप

समजते. सुबुद्धीचे तेच मुख्य कार्य आहे. ज्याच्या व्यक्तिमत्त्वामधून ही सुबुद्धी प्रगट होते तो एक फार उच्च स्थितीवर पोहचलेला सहजयोगी असतो सुबुद्धी देणारी देवता ही श्रीगणेशच आहे. म्हणून गणेश तत्त्व व्यवस्थित सांभाळले पाहिजे. सुबुद्धी तशी माणसात मुळातच असते. पण गणेशतत्त्व ठीक राहिल्यामुळे ती व्यक्त होऊ लागते. भक्तीमधून ही सुबुद्धी जोपासण्याचा प्रत्येकाने आवर्जून प्रयत्न केला पाहिजे. त्यानंतर आपोआपच अशी व्यक्ती पैसा,सत्ता अशा कसल्याच गोष्टींचा विचार करीत नाही तर आपल्यामधील शहाणपण व समजूतदारपणा वापरत राहते.परमेश्वराच्या इच्छेनुसारच त्याचे कार्य होत राहते. तोच खरा शहाणा आणि परमेश्वरी कार्याचा तो एक प्रभावी माध्यम बनतो. असा मनुष्य सदैव नम्र असतो, शांत असतो, रागाने किंवा चिडून बोलत नाही.

प्रत्येक माणसाला ही सुबुद्धी मिळविणे शक्य आहे. पशु-पक्ष्यांमध्येही ही सुबुध्दी उपजत असते, पण त्यांना त्याची जाणीव नसते. माणसामध्ये सुबुद्धी आली की तो सदैव जागरूक असतो. ही सुबुद्धी केवळ ध्यानामधूनच प्राप्त होऊ शकते. त्यासाठी भक्तीचा खरा अर्थही समजून घेतला पाहिजे. भक्ती वरकरणी असून काही होणार नाही. हे शहाणपण साध्या सुध्या नोकर चाकरामधूनही आपणास दिसून येते. खऱ्या अर्थाने सहजयोगी होण्यासाठी ही सुबुद्धी आणि शहाणपण आवश्यक आहे. अशी व्यक्ती कधीच कुठलीही चुकीची गोष्ट करणार नाही. हे सुध्दा देवीच्या आशीर्वादामधूनच घडत असते. अशीच माणसे संत पुरुष म्हणवण्यास योग्य असतात. अमेरिकेतही असे शहाणपण नसलेली अनेक माणसे वाटेल ते प्रकार काही काळ करीत होती. पण त्यांचा आपोआपच अंत झाला. कारण ते फक्त पैसा आणि सत्तेच्या मागे लागणारे लोक होते. त्यांच्यामध्ये खरे संतत्व नव्हते.प्रत्येक सहजयोगी संत बनू शकतो. पण शहाणपण जर जोपासले नाही तर त्याचा सहजयोगाला काही फायदा नाही. एक उदाहरण सांगण्यासारखे आहे. ''एका सहजयोग्याला गाडीतून जात असताना अचानक दुसऱ्या रस्त्याला जाण्याची इच्छा झाली. आणि नंतर समजले की आधीच्या रस्त्यावर मोठा अपघात झाला होता'' अशी अनेक उदाहरणे सांगता येतील. याच्या मुळाशी पण परमचैतन्याला त्यांची आवश्यकता असल्यामुळे अशा प्रकारच्या लोकांचे संरक्षण केले जाते. ज्याच्या जवळ अशी प्रगल्भ सुबुद्धी असते तोच परमचैतन्याच्या कार्याचे उत्कृष्ट माध्यम बनू शकतो. पूर्वीच्या काळी देवीने अनेक राक्षसांचा संहार केला, पण आताच्या काळी देवीच्या कार्याला अशा माध्यमाची जरुरी आहे. मी प्रथम अमेरिकेला आले तेव्हा येथे अनेक अगुरुंचे अनिष्ट प्रकार चालू होते. म्हणून मी नऊ वर्षे परत अमेरिकेला आले नाही. त्या काळात असे अनेक अगुरू झाले आणि लोक वेड्यासारखे त्यांच्या मागे लागले होते. पण आता परिस्थिती सुधारत आहे. लोकांच्यात सुबुद्धी हळू- हळू जागृत होत आहे. म्हणूनच तुम्ही जास्तीत जास्त लोकांना सहजयोग सांगत चला आणि त्यांच्या मूळ आत्मस्वरूपाची त्यांना जाणीव करून देत चला. म्हणजे त्यांना चर्च, मंदिर इत्यादी प्रकारे काही मिळण्यासारखे नाही हे समजेल. एकदा आत्मतत्त्व जागृत झाले की लोक सरळमार्गावर येतील. त्यासाठीच प्रत्येक सहजयोग्याने श्रद्धा आणि भक्ती वाढवून स्वत:च्या उन्नतीचा प्रयत्न करीत राहिले पाहिजे. भक्ती आणि श्रद्धा अत्यंत सुंदर पोषक आणि आनंददायी प्रवृत्ती आहेत. त्यासाठीच आपल्यामधील सुबुद्धी आणि शहाणपण (Wisdom) जोपासले पाहिजे. देवीची श्रध्दापुर्वक भक्ती केल्यानेच शहाणपण तुमच्यामधे जागृत होईल.

शहाणपण ही एक फार मोठी शक्ती आहे. आणि












त्याच्यामागे देवीचीच कृपा आहे. मानवामध्ये ही सुबुद्धी वाढणे हा उन्नतिप्रक्रियेचा भाग आहे. देवीच्या कृपेने आजपर्यंत मानवाने जी उन्नती मिळविली त्याच्या पुढील प्रगतीसाठी श्रद्धा, भक्ती आणि सुबुद्धी फार आवश्यक आहे. म्हणूनच ख्रिस्तांनी "Behold The Mother" असा उपदेश केलेला होता.पण माणसाच्या अजूनही चुकीच्या वृत्ती बदलत नाहीत आणि त्याला खरे सत्य समजल्याशिवाय उन्नतीचा वेग येणार नाही.

म्हणून तुम्ही सहजयोगाचे कार्य करतानाही मला सांगावेसे वाटते की, तुमच्यामध्ये हे दैवी शहाणपण आहे अथवा नाही हे तपासत रहा, त्यानुसार स्वत:ला घडवा.म्हणजे तुम्हाला देवीचे आशीर्वाद प्राप्त होतील. त्यासाठीच अधिक अधिक ध्यानात राहणे आणि अधिक अधिक चैतन्य लहरींच्या संपर्कात रहाणे आवश्यक आहे. म्हणजे तुम्हाला स्वत;ची स्थिती आणि चैतन्यलहरींची जाणीव जास्त स्पष्टपणे जाणवेल.मग तुमच्या लक्षात येईल की इतर कोणतीही भौतिक संपत्ती मिळविण्यापेक्षा अशी श्रद्धा, भक्ती आणि शहाणपण मिळविणे याच्यासारखी दुसरी गोष्ट नाही. त्यातूनच तुम्हाला आनंदाचा खरा अनुभव येईल. आताचा समय परमेश्वरी कार्य घडून येण्याचाच आहे. म्हणूनच मी आता तुमच्या देशाकडे जास्त चित्त लावून आहे. पण तुम्हीच श्रद्धा, भक्ती आणि सुबुद्धी मिळवून तुम्ही मला मदत करणार आहात. कधी कधी सहजयोग्यांचेही याच्याकडे दुर्लक्ष होते. खरेतर सहजयोग नीट समजण्यासाठीही अगोदर शहाणपण (Wisdom) पाहिजे. नुसते स्वत:ला सहजयोग करतो असे म्हणून काही मिळत नाही तर तुमच्यामधून सहजयोग व्यक्त झाला पाहिजे. तुमच्यामधील संतुलन, शांती आणि प्रेम व्यक्त झाले पाहिजे आणि सर्वत्र पसरले पाहिजे.

अमेरिकेमध्ये याची आजकाल फार जरुरी आहे. कारण येथे अहंकार, सत्ता व पैसा याच्यामागे लागण्याच्या प्रवृत्ती फार बळावत आहेत. पण त्यांच्या चुका आता त्यांच्या लक्षात येऊ लागल्या आहेत. आता त्यांनी स्वत:ला नीट ओळखण्याची वेळ आली आहे. आता अमेरिकेत सहजयोग खूप पसरला आहे आणि सहजयोग्यांची स्थितीपण सुधारत आहे. म्हणून त्यांनी त्यांची शक्ती परमेश्वरी कार्याकडे अधिक लावणे श्रेयस्कर आहे.

– सर्वांना अनेक आशीर्वाद

● ● ●

## लॉस एन्जिल्स, अमेरिका येथे श्रीमाताजींचे आगमन

गुरुवार दिनांक ३ ऑगस्ट २००६ रोजी श्रीमाताजींचे Los Angeles येथे आगमन झाले.

Realize America Tour मधील योगी तसेच तेथील स्थानिक सहजयोगी मोठया उत्साहाने श्रीमाताजींच्या स्वागतासाठी जमले होते. श्रीमाताजींच्या आगमनाच्या वेळेस सर्वत्र प्रचंड चैतन्य पसरले होते. त्यांच्या निवासस्थानापाशी रस्त्यावर दुतर्फा, युवाशक्तीची मुले हातात मेणबत्या प्रज्वलित करून स्वागतासाठी उभी होती. एकीकडे स्वागतगीत चालू होते. श्रीमाताजींना आरती ओवाळण्यात आली. लाल व पिवळ्या रंगाचे गुलाब असलेला हार त्यांच्या चरणकमलांवर अर्पण करण्यात आला.



# विश्वरूप दर्शन
## श्रीदेवी भागवत स्कंध सातवा

आदिशक्ती श्री भगवतीदेवी पर्वतश्रेष्ठ हिमालयास तिच्या विराट स्वरूपाचे दर्शन घडवीत आहे व त्याबद्दल निरूपण करीत आहे.

हे पर्वतश्रेष्ठा, ज्या शक्तीने या विराट जगताला निर्माण केले ती शक्ती म्हणजे मायाच होय. पण माया ही शक्तीदेखील माझ्यापासून वेगळी असू शकत नाही. केवळ लौकिक अर्थाने आणि व्यवहारसुलभतेसाठीच माझ्या या शक्तींना अविद्या अथवा माया अशा वेगळ्या वृत्तीने संबोधतात, मूलतत्वाचा विचार केला तर ती अविद्या आणि माया असे जिला म्हटले आहे ती शक्ती वेगळी नाही, ती आत्मतत्त्वच आहे.

हे पर्वतराज, माझे हे स्वरूप अशा प्रकारचे आहे आणि मीच हे सर्व जग निर्माण करते, मी जर प्राणरूपी होऊन या जगतात, प्राणिमात्रात प्रवेश केला नाही तर इतर लोकांमध्ये चलन वलन, जन्म, मृत्यू इत्यादी भाव घडणार नाहीत. लौकिक व्यवहार साधणार नाहीत. म्हणून मी त्याप्रमाणे विचार करून नित्य कर्मे व इतर व्यवहार सुरळीत व्हावेत म्हणून प्राणाला पुढे करून सर्वात प्रवेश करते व त्यानंतर सर्व लौकिक व्यवहार सुरू होतात.

पण मी जरी व्यापकस्वरूपिणी आणि एकमेव असले तरी जसे शरीर असेल तसे ते निर्माण होतात. त्याचे देहधर्म शरीराप्रमाणे होतात. केवळ या वेगवेगळ्या उपाधींच्या वेगळेपणामुळे मीही भिन्न भिन्न स्वरूपात प्राप्त होते. जसे आकाश व घटाकाश यात भेद आहे. तसेच त्या प्राणिमात्रांतही भेद निर्माण होतात.

वस्तुमात्र उत्तम असोत किंवा अधम असोत, सूर्य दोन्ही वस्तुमानावर आपला प्रकाश पुरवितो, म्हणून त्याला काही दोष लागत नाही. त्याचप्रमाणे मीही उत्तम व अधम वस्तूत प्राणरूपाने राहूनही त्या वस्तूच्या ठिकाणी असलेल्या गुणदोषांनी लिप्त होत नाही. मी त्या गुणदोषांपासून अलिप्त राहते.

केवळ मायेच्या योगानेच आपण जीव अनेक आहेत अशी कल्पना करतो, पण ती कल्पना मुळीच सत्य नाही. तसेच मायेमुळेच ब्रह्मा, विष्णू, महेश हे सर्वजण वेगवेगळे आहेत. देव अनेक आहेत असे आपण म्हणतो. तेही केवळ मायेमुळेच. पण मूलस्वभावत: ही कल्पना खरी नाही. पण मायेमुळेच याही कल्पना आपण सत्य धरून चालतो.

तेव्हा हे हिमालया, थोडक्यात सांगायचे म्हणजे हे सर्व चराचर जगत् मीच असून ते सूत्रातील मण्यांप्रमाणे माझ्याच ठिकाणी ग्रंथित झाले आहे. खरे म्हणजे ईश्वर मीच आहे. तसेच सूत्रात्मा व विराट आत्मा हे दोन्हीही मीच असून ब्रह्मदेव, विष्णू व रुद्र या क्रमाने ब्राह्मी, वैष्णवी व शिवा या शक्ती सरस्वती, लक्ष्मी व पार्वती या नावाने ओळखल्या जातात त्या शक्ती मीच आहे.

सूर्य मीच असून ही अगणित नक्षत्रेही मीच आहे. तो तारकांचा नायक चंद्र, मीच आहे. तसेच उत्तमाधम पशुपक्षीही सर्व मायेने माझीच रूपे आहेत.

माझ्यावाचून या चराचर सृष्टीत एकही वस्तू वेगळी नाही आणि जर तसे कुणी वेगळे मानले तर ते शून्य आहे. एका रज्जूचे उदाहरण पहा. तीच सर्व मौक्तिकमाला, पुष्पमाला, दंड, जलधारा वगैरे निरनिराळ्या भेदातील स्वरूपांनी आपल्या अनुभवास येते. तसेच मीसुद्धा निरनिराळ्या ईश्वरीरूपातून वेगवेगळी म्हणून प्रत्ययास येते. पण मी एकच असते यात कसलाही संशय असू नये.

हे देवी, हे ईश्वरी, हे आदिमाये खरोखरच माझ्यासारख्या दीनावर जर तू कृपा करण्यास सिद्ध असशील तर एकच माझी इच्छा पूर्ण कर. हे कल्याणि तुझे जे विश्व व सृष्टी यात परिपूर्ण भरलेले विराट स्वरूप आहे. ते तू एकदा मला दाखव. म्या पामराची एवढी विनंती मान्य कर

हिमालयाचे हे भाषण ऐकून ब्रह्मा, विष्णू, शिवादी सर्व देव अत्यंत हर्षभरित व उत्साहित झाले व प्रसन्नचित्त होऊन त्यांनी हिमालयाच्या भाषणाची स्तुती केली.

नंतर देवीने देवांची इच्छा जाणली आणि भक्ताच्या सर्व अपेक्षा पूर्ण करणारी जणू ती कामधेनुरूप देवी तिने आपल्या प्रिय भक्तांना आपले विराट स्वरूप दाखविले व आपल्या भव्यस्वरूपाचे दर्शन घडविले.

त्या महादेवीचे सर्वश्रेष्ठाहून श्रेष्ठ असे जे विराटरूप होते, ते सर्व देवांनी पाहिले. ते होते कसे?....

महादेवीच्या विराट स्वरूपाचे दर्शन फारच अनाकलनीय होते. सत्यलोक हे त्याचे मस्तक होते. चंद्र व सूर्य हे त्याचे दोन नेत्र तेजाने तळपत होते. दिशा हे त्या स्वरूपाचे कर्ण होते, तर साक्षात वेद हेच त्याचे भाषण होते, सर्वत्र संचार करणारा वायू हा त्याचे प्राण होता. सर्वात्मक पण अव्यक्त हे त्याचे हृदय होते. पृथ्वी हाच त्या स्वरूपाचा जघन प्रदेश, तर नाभिकमलाच्या ठिकाणी नभस्थळ व भुवलोक दिसत होते. -ज्योतिषचक्र-हे त्या विराट स्वरूपाचे वक्षःस्थळ होते. महलोक ही त्याची ग्रीवा असून मुख म्हणजे जनलोक हे होते.

सत्यलोकाच्या खाली ललाटाच्या ठिकाणी यम लोक होते. इंद्र वगैरे देव हेच त्या विराट स्वरूपाचे बाहू होते. शब्द हा श्रोतेंद्रियाचा विषय, पण त्या विराट स्वरूपी महेश्वरीचे ते श्रवणेंद्रिय होते. नासापुटाचे ठिकाणी अश्विनीकुमार होते. गंध हे त्या देवीचे घ्राणेंद्रिय होते.

तिचे मुख हे साक्षात अग्नीच होता आणि दिवस व रात्र हे तिचे पंख होते. या पंखांनाच दोन बाजू म्हणतात. प्रजापतीचे वसतिस्थान हा त्या विश्वदेवीचा भ्रूविकास होता. उदक हा तिचा तालु भाग होता. सर्व रस हीच तिची जिव्हा होती आणि महाकाळ यम ह्या तिच्या दाढा होत्या.

सर्व स्त्री - पुरुषांचा परस्परातील स्नेहभाव हे तिचे दात होते आणि हास्यभावना हीच तिची माया होती. तिचे कटाक्ष म्हणजे प्रत्यक्ष सृष्टीची उत्पत्तीच असून त्या महेश्वरीचा वरचा ओठ लज्जाच होता. तसेच लोभ हा तिचा अधरोष्ठ होता व धर्म हा त्या विराट देवीचा पृष्ठ प्रदेश होता.

प्रजापती हे त्या विराट स्वरूपाचे जननेंद्रिय होते. त्यापासूनच पृथ्वीवरील सर्व वस्तुजात उत्पन्न होतात. समुद्र ह्या त्या देवीच्या कुशी होत्या आणि पर्वत ही त्या महादेवीची हाडे होती. नद्या ह्या तिच्या नाड्या होत्या व वृक्ष हे त्या देवीचे मनोहर केस होते. बालपण,तरुणपण व वृद्धावस्था या तिन्ही अवस्था म्हणजे त्या देवीच्या वयाच्या उत्तम गती होत्या. मेघ हे त्या देवीचे वलयांकित होते. सकाळ, संध्याकाळ ती त्या विराट स्वरूपाची वस्त्रे होती.

तसेच हरी हीच तिची विज्ञान शक्ती आहे असे म्हणण्याचा प्रघात आहे. रुद्र हे तिचे अंत:करण आहे असे प्रसिद्ध वचन आहे. अश्व वगैरे इतरही सर्व पशुजाती हे तिच्या श्रोणिप्रदेशात स्थिर आहेत. अतलाप्रमाणे इतर महालोकही त्या परादेवीच्या कटीच्या खाली असलेल्या प्रदेशावर राहिलेले दिसत होते.

असे ते महादेवीचे विराट स्वरूप सर्व देवांनी पाहिले.

हजारो ज्वालांच्या समुदायांनी ते परिपूर्ण होते व ती जिव्हेने जणू काय सर्व जगाचा आस्वाद चाखून अनुभव घेत आहे असा भास होता. त्या स्वरूपाच्या ज्या दाढा होत्या, त्या दाढांचा कट् कट् असा भयंकर ध्वनी होत होता. तिच्या नेत्रातून भयंकर अग्नीच्या ज्वाला प्रदीप्त होऊन बाहेर पडत होत्या. तिने नाना प्रकारची वैचित्र्यपूर्ण व वैशिष्टयपूर्ण अशी आयुधे धारण केली होती. ब्रह्मतेज व क्षात्रतेज ते त्या त्या वीरस्वरूपाचे भक्ष्य होते.

त्या विराट स्वरूपाला हजारो मस्तके होती, तसेच हजारो नेत्र होते व हजारो चरणही होते. त्या स्वरूपाचा प्रकाश कोटी सूर्य एकाच वेळी प्रकाशित व्हावे, इतका तेजस्वी होता. ते संपूर्ण विराट स्वरूप एक कोटी विद्युल्लता एकदम चमकाव्यात असे दैदीप्यमान व स्वयंप्रकाशी होते.

देव म्हणाले, - हे मातोश्री आम्ही खरोखर अनंत अपराधी आहोत. पण हे देवी, तू आम्हाला क्षमा कर. आम्ही तुझ्यापासून उत्पन्न झालो आहोत हे आम्हाला कळले. म्हणून तुझ्यापासून निर्माण झालेल्या आम्हा दीनांचे तू दयाळू होऊन रक्षण कर.

हे देवते, आम्ही तुझे हे विराट स्वरूप पाहून अत्यंत भयभीत झालो आहोत. अश्या या तुला आम्हासारख्या पामर देवांनी कसे बरे स्तवावे! हे परमेश्वरी, तुझा पराक्रम कशा प्रकारचा आहे आणि किती महान आहे हे तुझे तू सुद्धा जाणत नाहीस, जे तुलाही अनाकलनीय आहे, ते तुझ्यापासून उत्पन्न झालेल्या आम्हाला कसे कळू शकेल?

हे देवी, भुवनेश्वरी, तुला आमचा नमस्कार असो. हे देवी तुझ्या प्रणवाच्या रूपाला आमचे शतश: प्रणाम असोत. हे देवी, तुझे स्वरूप फक्त वेदांतातील वाक्यावरूनच सिद्ध होत असते. अशा या ऱ्हींकारस्वरूपिणी, तुझ्या चरणावर आम्ही नित्य मस्तक ठेवतो.

जिच्या स्वरूपापासून अग्नी उत्पन्न झाला आहे, चंद्र, सूर्य हे ज्या ठिकाणाहून निर्माण झाले आहेत, सर्व औषधींचा ज्या ठिकाणाहून उद्‌भव झाला आहे, त्या सर्वात्मस्वरूप असलेल्या तुला आमचे नम्रतापूर्वक नमस्कार असोत.

खरोखरच पर्वत, नद्या, समुद्र ही जेथून निर्माण झाली, त्या परमपवित्र मूळांपासून औषधी निर्माण झाल्या, जेथून सर्व रस उत्पन्न होतात त्या शक्तीपुढे आम्ही लोटांगण घालीत आहोत.

अशा प्रकारे देव अत्यंत भयभीत होऊन वारंवार देवीला नमस्कार करू लागले आणि तिला शरण जाऊन त्यांनी त्या परमेश्वरीची अपार स्तुती केली. तेव्हा देवांना अभय देण्यासाठी म्हणून कृपेचा जणू सागरच असलेल्या त्या जगदंबेने आपले अद्‌भुत असे विश्वरूप आवरले आणि क्षणातच ते रूप अदृश्य केले.

पाश, अंकुश, वरदमुद्रा या प्रकारच्या आयुधांनी युक्त असे अत्यंत कोमल सर्वांग आहे असे करुणरसपूर्ण अशा नेत्रांचे व प्रसन्न मुखकमल आहे असे ते पूर्वीचे, सर्वांना सुसह्य असे, आपले सुंदर रूप पुन्हा देवांना दाखविले.

तेव्हा त्या रूपाकडे पाहिल्यावर शांत होऊन देव भीतीपासून मुक्त झाले. त्यांचे मन स्थिर झाले आणि त्यांना अत्यानंद झाला. सर्व देवांना गहिवरून आले आणि त्यांचे स्वर सद्‌गदित झाले. त्यांनी अपार समाधानाने त्या मनोहर अशा देवी भगवतीला साष्टांग नमस्कार घातले.

त्यानंतर आदिशक्तीने हिमालयास योगस्वरूपाचे वर्णन, योगविधी विस्तारपूर्वक निवेदन केला, आणि आता ती ब्रह्मतत्त्वाची महती, आत्म्याच्या साक्षात्काराचा आनंद, त्या अनुभवाचा उपदेश करीत आहे.

## ब्रह्मतत्वाचे निरुपण

हे पर्वतश्रेष्ठ हिमालया, जे प्रकाशरूप आहे,सर्व प्राण्यांच्या हृदयामध्ये जे स्थिर आहे ज्यामुळे सर्व व्यवहार सहजगत्या होत असतात, व जे अत्यंत श्रेष्ठ आहे, जे सर्व प्राणिमात्रात, वस्तुमात्रात भरून राहिलेले आहे, ते माझे श्रेष्ठ पद आहे, याचेच तुम्ही सत्वर ज्ञान करून घ्या. तेच मूर्त व अमूर्त अशा दोन्ही पदार्थांचे स्वरूप आहे. म्हणून प्राण्यांच्या विज्ञानाहून ते श्रेष्ठ असून सर्वात वरिष्ठ अशा त्या ब्रह्मपदाचीच सर्वांनी इच्छा धरणे यथायोग्य आहे. सूर्य व सूर्याप्रमाणे प्रकाशमान होणाऱ्यांचे ते प्रकाशक असे दीप्तिस्थान आहे. ते अत्यंत दीप्तिमान, अणुहूनही अत्यंत अणू व ज्या ठिकाणी भू, स्वर्ग, पाताल इत्यादी लोकही सामावू शकतात असे विशालही आहे. ते अक्षय ब्रह्म, तेच प्राण, वाणी, मन, तेच सत्य आणि तेच ब्रह्मपद म्हणजे अमृत आहे.

भूलोक,पृथ्वी, अंतरिक्ष व सर्वे कर्मेंद्रिये यासह मन ज्या आत्म्यात पूर्णपणे गोवलेले आहे अशा त्या एका आत्म्याचीच जाणीव ठेवावी. कारण हाच एकमेव मोक्षाचा सेतू असून संसाररूपी प्रचंड महासागरातून तरून जाण्यासाठी हे एकच मुख्य साधन आहे.

रथाच्या नाभीत जशा आरा सर्वत्र असतात, तशा तेथे सर्व नाड्या समुदायाने एकत्र जुळलेल्या आहेत, अशा हृदयात बुद्धीच्या प्रयत्नांनी पुष्कळ प्रकारे भासमान होणारा आत्मा तेथे राहतो. तेथे आत्म्याचे प्रतीक असलेला अथवा आत्म्याची संज्ञा असलेला असा जो प्रणव, त्याचाच आश्रय करावा व एकतानता पावून ध्यान करावे.

नंतर त्या परमात्म्याचा साक्षात्कार झाल्यावर हृदयग्रंथीचा भेद होतो, म्हणजेच चित् आणि जड यांचे जे तादात्म्य झालेले असते त्याचा भेद होतो आणि सर्व संशय व विकृती नाहीश्या होतात. त्याची सर्व संचिते व त्यांनी केलेली सर्व फलापेक्षेची कर्मे क्षीण होतात.

सारांश त्रिगुणरहित मायाशून्य, निर्मल, सूर्य वगैरे ज्योतींनाही प्रकाश देणारे व फक्त केवल ज्ञानीच जे जाणू शकतात ते ब्रह्म ज्योतिरूप अशा त्या आनंदमय कोशात नित्य राहते.

मी पूर्वी सांगितल्याप्रमाणे हे अमृतरूप ब्रह्मच पुढे आहे, तेच मागेही आहे, दक्षिणेकडेही तेच असते व उत्तरेकडेही त्याच ब्रह्माची जाणीव होते. खाली-वर असे सर्वत्र तेच एकमेव ब्रह्म पसरलेले आहे. इतकेच काय, पण हे जे सर्व दृश्य जगत् आहे. तेही ब्रह्मच आहे.

थोडक्यात असे की असा हा अनुभव ज्याला प्राप्त होतो तोच पुरुषश्रेष्ठ कृतार्थ समजावा. तोच ब्रह्मरुप झाल्यामुळे त्याचे अंत:करण प्रसन्न होते. तो कधीही शोक करीत नाही किंवा अप्राप्त वस्तूविषयी कधी खेद करीत नाही. प्रिय वस्तूविषयी कशाची इच्छाही करीत नाही.

हे शैलराजा, द्वैतभाव मनात बाळगल्यास भय उत्पन्न होते हे तर सर्वत्र विदितच आहे. पण द्वैताचा अभाव झाल्यावर अद्वैतवादी वृत्ती बनल्यामुळे आत्मज्ञानी कधीही भीत नाही. त्यामुळे त्याचा व माझा एकमेकापासून कधीही, कुठेही वियोग होत नाही हे सत्य आहे.

हे पर्वता, मीच तो व तोच मी आहे असे तू शंका मनात न ठेवता जाण. मला जाणणाऱ्यास तो ज्या ठिकाणी असेल तेथेच माझे सत्वर दर्शन घडते. मी तीर्थाचे ठिकाणी वास्तव्य करते किंवा कैलासपर्वतावर राहते अथवा वैकुंठातच माझा नित्य वास असतो हे समजणे खरे नाही. माझ्या स्वरूपाचा ज्याला साक्षात्कार झाला आहे अशा ज्ञानी पुरुषाच्या हृदयकमलामध्ये माझे नित्य वास्तव्य असते यात संशय नाही.

माझी पूजा करण्यापेक्षाही माझा साक्षात्कार ज्याला झाला आहे त्याचे पूजन करणे हे कोटी फले देणारे पुण्य आहे. अशा या पूजकाचे कुल पवित्र होते, त्याचा उद्धार होतो व त्या पूजकाची माता कृतार्थ व धन्य होय. ज्या साधकाच्या अंतकरणाचा लय चैतन्यामध्ये झालेला असतो त्याच्या योगाने पृथ्वीही पुण्यवती होते. इतके त्या साधकाचे ऐश्वर्य मोठे आहे.

हे पर्वता, पित्यापासून मातेच्या उदरातून प्राप्त झालेला जन्म नष्ट होतो, पण ब्रह्मोपदेश मिळाल्यामुळे जो पुनर्जन्म प्राप्त होतो तो नष्ट होत नाही. ब्रह्म प्राप्त करून देणारा गुरू हा सर्वात श्रेष्ठ आहे असा शास्त्र सिद्धांतच आहे.

देवी भागवतातील वरीलप्रमाणे साक्षात श्री भगवती देवीने केलेले निरूपण आत्मसात केल्यावर आपल्या हे लक्षात येते की, आत्मसाक्षात्कार मिळणे ही आपल्या दृष्टीने आयुष्यातील परमोच्च अशी भाग्यकारक घटना होय! आणि तो साक्षात आदिशक्तीकडूनच प्राप्त होणे हे तर सर्व सहजयोग्यांचे केवढे महद्भाग्य!

●●●

# आदर्श सहजयोगी होण्यासाठी खालील गोष्टी अंगीकारणे आवश्यक आहे

## आत्मसाक्षात्कार :-

सहजयोगाची पहिली पायरी म्हणजे आत्मसाक्षात्कार. एक पायरी चढल्याबरोबर प्रवासाला सुरवात होते. परंतु एकच पायरी चढून थांबल्यास प्रवास पूर्ण होणार नाही.

आपण एकाच शरीराचे अंग प्रत्यंग असलो, आदिशक्तीच्या शरीराच्या पेशी असलो, तरी आपण स्वयंनिर्भर असतो.म्हणून प्रत्येकाने हा प्रवास एकट्याने व वैयक्तिकरीत्या करायचा असतो.

आपल्याला चढायच्या असतात त्यापैकी काही पायऱ्या अजून अगम्य आहेत, काही केवळ आपल्यासाठीच वैशिष्ट्यपूर्ण असतात. पण काही पायऱ्या सर्वज्ञात व सर्वमान्य असून या प्रवासात यशस्वी होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला या पायऱ्या चढणे आवश्यक आहे. अशा एकवीस पायऱ्या असून आपल्याला सहजयोगी व्हायचे असल्यास त्या सर्व चढून जायला हव्यात. प्रत्येक पायरी अगदी लहान असली तरी सर्व पायऱ्या चढून गेल्यानंतरच आपल्या घटित होण्याच्या दिशेकडे आपण फार मोठे पाऊल उचलतो.

## श्रीमाताजी कोण आहेत हे आपण विसरू नये.:-

मी परमपित्याची प्रार्थना करीन आणि ते तुम्हाला एक कम्फर्टर (आराम देणारे) देतील. ते कम्फेर्टर आदिशक्ती असून माझ्या नांवाने परमपिता यांना पाठवतील. ते तुम्हाला सर्वकाही शिकवतील. (श्री येशू ख्रिस्त)

आजच्या या दिवशी मी जाहीर करते की मला मानवाला तारायचे आहे.

मी असे जाहीर करते की, आदिशक्ती जी आहे ती मीच आहे, सर्व मातांची माता आहे, आदिमाता आहे, परमात्म्याची शुद्ध इच्छा आहे, आणि त्या इच्छेचे सार्थक करण्यासाठी, या सृष्टीचे व सर्व मानवांचे सार्थक करण्यासाठी या शुद्ध इच्छेने अवतार घेतला आहे आणि हे सर्व माझ्या प्रेमातून पेशन्स(धीरातून)माझ्या शक्तीमधून सर्व मी साध्य करीन अशी मला खात्री आहे.

या पूर्वीही मी जन्म घेतला पण आता मी माझ्या संपूर्ण रूपात आणि शक्तीसहित आले आहे. केवळ मानवाला निर्वाण देण्यासाठी किंवा मुक्ती देण्यासाठीच मी आले नाही तर तुमच्या परमपित्याला जे परमेश्वरी राज्य व आनंद तुम्हाला द्यायचे आहेत ते देण्यासाठी मी आले आहे. (श्री माताजी २.१२.१९७९)

हा समय महत्त्वाचा आहे. याची जाणीव तुमच्या हृदयात हवी. तुम्ही अतिशय महत्त्वाच्या काळात येथे आला आहात आणि शिवाय जेव्हा तुम्ही माझ्या, समवेत असता तो काळ सर्वात महत्त्वाचा असतो आणि खऱ्या अर्थाने तुम्ही त्याचा पूर्ण लाभ घ्यायला हवा. (श्रीमाताजी २१.५.८४)

## रोज नियमितपणे ध्यान करायला हवे

वृद्धिंगत होण्यासाठी आपण रोज ध्यान करायला हवे. रोज, अगदी रोजचे रोज, ध्यान करणे महत्त्वाचे आहे.

एखादे दिवशी जेवण करू नका, खाऊ नका, कामावर जाऊ नका, रोज करता त्यापैकी एखादी गोष्ट एक दिवस करू नका. पण रोज ध्यान करा. हे अत्यंत महत्त्वाचे आहे. (श्री माताजी १२-८८)

ध्यानासाठी अधिक वेळ देण्याची आवश्यकता नाही. पण, जो काही वेळ तुम्ही देता व जे काही तुम्हाला त्यातून प्राप्त होते, ते बाह्यात दिसून यायला हवे. तुमच्यातून ते बाहेर यायला हवे, गहनतेमध्ये गेल्याशिवाय इतर सहजयोग्यांना तुम्ही वाचवू शकणार नाही. व जे सहजयोगी नाहीत त्यांना आपण वाचवू शकत नाही. (श्री माताजी २७.७.८१)

ध्यान आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. मानवाला जसा श्वास घ्यावा लागतो तसे तुम्हाला ध्यान करायला हवे. ध्यान केले नाही तर तुम्ही कधीही मोठे होणार नाही; तुम्ही तसेच रहाल. जेव्हा ध्यान करून गहन होता, तेव्हा तुमच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो.उथळपणाचा काही फायदा होणार नाही. या कारणासाठी ध्यान करायला हवे. (श्रीमाताजी २.५.८७)

जे सहज योगात येतात आणि ध्यान करीत नाहीत व उन्नत होत नाहीत, ते नष्ट होतात अथवा सहजयोगाच्या बाहेर फेकले जातात. (श्रीमाताजी २८.७.८५)

## दुसऱ्यावर टीका करू नये

तुमच्या प्रवत्ती बदला. दुसऱ्यामध्ये चांगले काय आहे ते पहाण्याचा प्रयत्न करा, पहायला शिका, निदान सहजयोग्यांचे बरोबर तुम्हाला असे करता येईल- त्यांच्यात चांगले काय आहे ते बघायला शिका, सहजयोगासाठी त्यांनी काय चांगले केले आहे; तुम्हाला त्यांच्याकडून काय मिळाले आहे, यांच्या समवेत कसे रहायचे ते पहा. त्यांच्याशी चांगले वागून त्यांना प्रोत्साहन देऊन, तुम्ही सहजयोगाला मदत करता (श्रीमाताजी २८.७.८५)

तुझ्या बांधवांच्या डोळ्यांतील कुसळ पहात असताना तुझ्या स्वत:च्या डोळ्यात असलेल्या मुसळाचा विचार का करीत नाहीस? दांभिक माणसा, प्रथम स्वत:च्या डोळ्यातील मुसळ काढून टाक मगच दुसऱ्याच्या डोळ्यातील मुसळ काढून टाक. मगच दुसऱ्याच्या डोळ्यातील कुसळ काढायचे तुला स्पष्ट समजेल. (श्री येशूख्रिस्त)

दुसऱ्याच्या दोषांकडे पहाताना आपल्यातील दोष वाढतात (श्री बुध्द)

तुमच्या आईच्या नजरेत इतरांच्यापेक्षा तुम्ही उच्च कसे असाल? ते शक्य नाही. उलट अशा कल्पना करण्याचा प्रयत्न केल्यास आई तुम्हाला शिक्षा देईल. ( श्री माताजी २८.७.८५)

नियमितपणे रोज जोडेपट्टी करावी. पाण्यात पाय ठेवून बसावे, एक दुसऱ्यांना चैतन्य लहरी द्याव्यात.

## आत्म्याच्या विरोधांत काही बोलू नये अथवा काही करू नये.

मी पाहिले आहे, लोक म्हणतात - मी धूम्रपान करतो आहे, पण अजून मला चैतन्य लहरी आहेत, मग त्यांत काय बिघडले? मी दारू पितो पण अजून मला चैतन्य लहरी आहेत. अजून मी अगुरूच्याकडे जातो पण मला चैतन्यलहरी आहेत, हे असेच वाढत जाते- पण एक दिवस चैतन्य लहरी थांबतात आणि तुमच्या लक्षात येते की तुम्ही सर्व मर्यादांच्या पलीकडे आहात. पूर्णपणे तुम्ही बाहेर फेकले जाता. तुम्ही कसे बाहेर जाता हे तुम्हालाच समजत नाही. हळू हळू तुमच्या लक्षात येते की टँजन्ट- प्रमाणे तुम्ही बाहेर गेला आहात, म्हणून फार काळजीपूर्वक रहायला हवे. तुमच्यामध्येच दोन शक्ती (फोर्स)आहेत, केंद्रबिंदूकडे नेणारा व केंद्र बिंदू पासून दूर नेणारा.एकादशांची शक्ती तुम्हाला केंद्रबिंदूपासून दूर नेते व त्याच्यामुळे तुम्ही बाहेर फेकले जाता.

सहजयोग कोणाच्या विनवण्या करत नाही. तुम्हाला रहायचे असल्यास पूर्णपणे रहायला हवे. रहायचे नसल्यास, सहजयोग तुम्हाला अपेक्षेपेक्षाही जास्त जलद बाहेर फेकतो.

## आपण सतत श्रीमाताजींच्या कॅसेट्स पहाव्यात अथवा ऐकाव्यात

ते काय करतात, केंद्रावर एक टेप घेऊन जातात, सर्वजण ती ऐकतात, मग झाले. प्रत्येकाच्या जवळ एक टेप हवी. ते सुद्धा लोक करीत नाहीत. तुम्ही पुन्हा पुन्हा कॅसेट ऐकायला हवी.

कागद पेन्सिल घेऊन बसा व मी काय सांगितले आहे ते नीट समजावून घ्या. - (श्रीमाताजी विराट पूजा)

## सामूहिकतेमध्येच प्रगती होते.

आता ज्यांना सामूहिकतेमधे रहाता येत नाही, ते सहजयोगी नव्हेत. सामूहिकतेच्या बाहेर जाण्याचा प्रयत्न करणाऱ्यांनी हे लक्षात घ्यावे की त्यांच्यातच काहीतरी कमतरता आहे.

दुसऱ्याच्या संगतीत आनंद वाटायला हवा. दुसऱ्यांच्या बरोबर काम करणे आवडायला हवे. दुसऱ्यांच्या सौंदर्याचा, दुसऱ्यांच्या चैतन्यलहरींचा आनंद घ्यावा. पण ज्यांना असे वाटते की आपल्यासाठी वेगळे असावे, वैयक्तिक खाजगी असावे, ते अजून पूर्ण परिपक्व झाले नाहीत.

सामूहिकता, हा तुमची परीक्षा करण्याचा चांगला मार्ग आहे. आपण मोठे होतो तसे आपल्याला वेगळेपण हवे असते, वेगळ्या वस्तू लागतात. त्यात आनंद नसतो, काहीच आनंद नसतो. म्हणून स्वत:ची परीक्षा करण्यास प्रत्येक सहजयोग्यास उत्तम मार्ग म्हणजे 'आपण किती कलेक्टिव्ह आहोत' ते पहाणे, दुसऱ्याच्या संगतीत राहणे मला किती आवडते आणि माझे स्वत:चे निराळे असावे 'माझे मूल, माझा पती, माझे स्वत:चे कुटुंब, माझी स्वत:ची खोली' असे किती वाटते हे पहावे. ज्या लोकांना असे वाटते ते अजून पूर्ण सहजयोगी झाले नाहीत, ते अजून अपरिपक्वच आहेत आणि ज्या स्थानावर आहेत तिथे असण्यास अपात्र आहेत. (श्रीमाताजी २१.५.८४)

## आपणास माहीत असलेले प्रश्न आपणच सोडविण्याचा प्रयत्न करायला हवा

तुमच्यात काहीतरी बिघडले आहे, हे जो पर्यंत तुमच्या लक्षांत येत नाही, तो पर्यंत तुम्ही स्वत:ला ठीक करू शकत नाही-तुमच्यात हे बिघडले आहे, ते बिघडले आहे, अमुक चक्रावर पकड आहे व ती काढायल हवीए- असे सहजयोग तुम्हाला सांगतो. ती पकड काढून टाकल्यास तुम्हाला पूर्णपणे बरे वाटते. तुमचेच शरीर आहे आणि तुमचीच चक्रे आहेत. आणि तुमचेच जीवन आनंदी व्हायला हवे, म्हणून तुमच्यात काय बिघाड आहे ते लक्षात आल्यस तो काढून टाकण्याचा प्रयत्न करायला हवा- (श्री माताजी १२.५.८७)

गळे बदलून टाका आणि अगदी नवीन व्यक्ती बना. फुलासारखे तुम्ही उमलता, मग वृक्ष होता आणि मग तुमचे स्थान ग्रहण करता. सहजयोगी म्हणून तुमचे स्थान ग्रहण करा. ते अगदी सोपे आहे. मला प्रसन्न करायला हवे कारण मी चित्त आहे, मी प्रसन्न झाले तर तुमचे काम झाले. परंतु भौतिक गोष्टींनी किंवा वादविवादाने मी प्रसन्न होत नाही तर तुमची उन्नती पाहून प्रसन्न होते. म्हणून त्याच्यावर स्वत:ला पडताळून पहा- ( श्री माताजी २१.५.८४)

स्वत:ला अलिप्त करण्याचा प्रयत्न करा. क्रोध, वासना, लोभ, प्रत्येकावर नियंत्रण मिळवा. कमी खा, खादाड लोकांसारखे भरमसाठ खाऊ नका. एखादे दिवशी मेजवानीचे प्रसंगी तुम्ही जास्त खा, परंतु सारखेच जास्त खाऊ नये. ते सहजयोग्याचे लक्षण नव्हे. कंट्रोल करण्याचा प्रयत्न करा. तुमच्या बोलण्यावर कंट्रोल करा. तुमच्या बोलण्यातून क्रोध व्यक्त होतो की खरी करुणा व्यक्त होते की तुमच्यात कृत्रिम कारुण्य आहे हे पहा- (श्रीमाताजी २१.५.८४)

## _सुधारणा करायला सांगितल्यास प्रतिक्रिया व्यक्त करू नये.

तुमच्याबद्दल कोणी काही म्हणाले व ते खरे नसले तर त्याची काळजी करण्यासारखे काय आहे? परंतु लोक म्हणतात ते खरे असल्यास त्यासाठी काहीतरी करायलाच हवे-मी तुमच्यावर रागावले, तुम्हाला बोलले, तुमचे लाड केले, अमुक करू नका, फार निकट येऊ नका, लांब रहा असे सांगितले काही जरी केले तरी ते तुमच्या

हिताचे असते. आणि माझ्या दृष्टीने तुमचे हित एकच आहे, तुम्ही बंधनमुक्त व्हावे, माझ्याकडून काहीतरी तुम्ही मिळवावे. माझ्यातून तुमचा उत्कर्ष व्हावा- (श्री माताजी २१.५.८४)

आपण सर्वज्ञ असून आपणास आवडेल असे दुसऱ्यांनी वागावे अशा भ्रमात आपला अहंकार आपल्याला मूर्ख बनवून ठेवणार नाही, याबद्दल आपण दक्ष असावे

: तुमच्या अहंकाराशी लढू नका.झगडण्याचा प्रयत्न केल्यास तो अधिकच तुमच्या डोक्यावर चढेल. लढण्याचा हा मार्ग नाही, की तुमच्याकडे अहंकार आहे आणि तुम्ही त्यांच्याशी लढाई करीत आहात: अहंकाराशी कधीही भांडू नका. केवळ त्याला पहाणे हाच एक मार्ग आहे.

: तुमचे चित्त फार महत्त्वाचे आहे. तुमचे चित्त आता प्रकाशित झाले आहे. ज्याच्याकडे तुम्ही पहाल ते योग्य आकारचे होईल.

: अहंकार मोठा झाल्यास, त्याच्याकडे फक्त लक्ष ठेवा, उत्तम म्हणजे आरशामध्ये स्वत:ला पहा आणि विचारा ' काय श्री ईगो कसे काय आहे?' मग तो खाली येईल. पण त्याच्याशी भांडू नका, फक्त पहायचे असते. अनेक प्रकारचे अहंकार असू शकतात; अधिक शिकलेले असाल तर तुम्ही अहंकरी होता, शिकलेले नसाल तरी अहंकार असतो कारण आपण कोणीतरी आहोत हे दाखवायचे असते.- (श्री माताजी २८.७.८५)

: आता माणसाच्या बाबतीत मुख्य प्रश्न निर्माण होतो की ते स्वत:ला गुरू समजू लागतात. ते सहजयोगाचे विषयी बोलू लागतात, व त्यांना असे वाटते की ते श्रीकृष्णच झाले आहेत. सहजयोगाविषयी अज्ञानी असलेल्या व्यक्तीपेक्षाही त्यांना जास्त अहंकार असतो. इतक्या प्रचंड अहंकारातून ते बोलू लागतात की मलाच त्यांची भीती वाटते. कधी कधी मला वाटते की त्यांना किती सहजयोग समजला असेल? पण ते मात्र स्वत:चेच खरे आहे असे बोलतात. - (श्रीमाताजी २८.७.८५)

: काही जण म्हणतात की आता आम्ही इतके मोठे झालो आहोत की आम्हाला पाण्यात पाय ठेवून बसण्याची आवश्यकता नाही. ध्यान करण्याची आवश्यकता नाही. असेही काही असतात की ते म्हणतात, आता आम्ही सहजयोगी आहोत आणि पाप आम्हाला स्पर्श करू शकणार नाही. आम्ही उच्च स्थितीला गेलेले आत्मे आहोत. परंतु सर्वात वाईट लोक ते आहेत की जे माझे नांव घेऊन सांगतात की- श्रीमाताजी असे असे म्हणाल्या आणि मी तुम्हाला सांगतो आहे कारण माताजींनी सांगितले आहे- आणि वास्तविक मी तसे काहीच म्हटले नसते व ते सर्व खोटे सांगत असतात.- (श्रीमाताजी ६.८.८८)

## आपल्या जीवनांत महत्त्वाच्या गोष्टींचे पूर्णतया अवलंबन करायला हवे

: तुमच्या शेजाऱ्यावर स्वत:प्रमाणे प्रेम करा तुमचा शेजारी कोणी सहजयोगी असेल तर त्याच्या बाजूला रहा.आणि तुमच्या आईवर विश्वास ठेवा. जसा मी तुमच्यावर विश्वास ठेवला आहे तसा तुम्ही माझ्यावर ठेवायला हवा; मग सर्व कार्यान्वित होईल. हा विश्वास ठेवण्यासाठी तुमचे हृदय उघडा. यात मान-सन्मान मिळेल की नाही याची चिंता करू नका. कारण हृदयाला माहिती असते, तुमच्या प्रेमळ हृदयात जो विश्वास असतो तो विश्वास सर्व काही करीत असतो. प्रेमच सर्व अद्ययावतता, सुगंधीपणा देते, प्रेम बोलण्यासाठी नसावे तर खरोखरीच प्रेम आपल्यामध्ये असावे. - (श्रीमाताजी २१.५.८४)

: आई सारखे व्हा; असे कारुण्य तुमच्यामद्धे विकसित होऊ दे की इतरांच्यासाठी तुमच्यामद्धे आईसारखे किंवा पित्यासारखे प्रेम असेल, खरोखरीच इतरांना तुम्ही आईचे प्रेम व कारुण्य द्यायला हवे. स्वत:च्या ऐषआरामाच्या किंवा फायद्यांचा विचार न करता इतरांना आपल्याला कसा ऐषआराम देता येईल याचा विचार करावा.(श्री माताजी २८.७.८५)

तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥

१५ ऑगस्ट २००६











